# सहनिबंधक सहकारी संस्था(सिडको),
## सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालय

रायगड भवन, तिसरा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

☎ दुरध्वनी क्र. ➢ २७५७४५०५ Email ➢ jointregcidco@gmail.com

जा.क.सनि/सस/सिडको/५/८०३०/२०१८ दिनांक:-28/०५/२०१८

प्रति,
**श्री. अमिताभ कुमार** — मुख्यप्रवर्तक,
नियोजित **अधिराज गार्डन्स (झिन्नीया)** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या,
भूखंड क्र. **३**२, सेक्टर ०५,
**खारघर**, नवी मुंबई

विषय :— नियोजित, **अधिराज गार्डन्स (झिन्नीया)** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या,या संस्थेचे नांव राखून ठेवून बॅकेत खाते उघडणेबाबत.

कृपया आपले लक्ष आपल्या दिनांक २३/०५/२०१८ रोजीच्या वरील विषयासंबंधीच्या पत्राकडे लक्ष वेधून कळविण्यात येते की, आपल्या नियोजित संस्थेचे नांव नियोजित, **अधिराज गार्डन्स (झिन्नीया)** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, भूखंड क्र. **३**२, सेक्टर ०५, **खारघर**, नवी मुंबई असे राखून ठेवण्यात येत असून आपणास नियोजित संस्थेच्या नावाने खालील नमुद केलेल्या बॅकेत खाते उघडण्यासाठी परवानगी खालील अटीवर देण्यात येत आहे.

१.नाव राखून ठेवल्यापासून तीन महिन्याचे आत संस्थेचे नोंदणी प्रकरण या कार्यालयास सादर करावे. तसेच सर्व गाळे खरेदी करार भारतीय नोंदणी कायदा १९०८ नुसार नोंदवून व मुद्रांक शुल्क भरलेल्या पावत्यांच्या सत्यप्रती प्रकरणासोबत जोडाव्यात.

२. राखून ठेवलेले नाव तीन महिन्यापर्यंत राहील. नोंदणी प्रकरण तीन महिन्याचे आत सादर न केल्यास नियोजित संस्थेचे नांव रद्द समजण्यात येईल.

३. तीन महिन्यात नोंदणी प्रकरण सादर करणे शक्य नसल्यास संयुक्तीक कारणासह मुदतीत मुदत वाढीसाठी अर्ज करावा.

४ नियोजित संस्थेच्या नावाने खाते मुख्यप्रवर्तकांच्या सहीने उघडण्यात यावे.

५ नियोजित संस्थेच्या नावाने उघडलेल्या खात्यांतील रक्कम संस्था नोंदणी होऊन संस्थेच्या नावाने कारभार सुरू होई पर्यंत नोंदणी अधिका—यांच्या पूर्व परवानगी शिवाय काढण्यात येवू नये.

६. नियोजित संस्थेचे नांव राखून ठेवून बॅकेत खाते उघडण्याची परवानगी दिली म्हणजे संस्था नोंदणी होईलच असे नाही, याची नोंद घ्यावी.

७. नियोजीत संस्थेचे नोंदणी प्रस्तावा सोबत प्रवर्तक सदस्यांच्या करार नोंदणी पावत्यांच्या दोन्ही बाजूच्या छायांकीत प्रती सादर कराव्यात.

८. नोंदणी प्रकरणासोबत टाईटल सर्टीफिकेट जोडावे/भोगवटा प्रमाणपत्र जोडावे/भोगवटा प्रमाणपत्र नसल्यास संबंधित प्राधिकरणाचा इमारत अधिकृत असलेबाबतचा दाखला जोडावा.

९. नोंदणी प्रस्ताव सादर करताना मा. सह आयुक्त व निबंधक सह. संस्था म.रा.पुणे. व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्देशित केल्यानुसार सर्व कागदपत्र जोडण्यात यावीत.

१०.मुख्य प्रवर्तकांनी अवश्यक त्या ठिकाणी प्रतिज्ञा लेख/प्रतिज्ञापत्र सादर करावीत.

११.नोंदणी प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रांबाबत मुख्य प्रवर्तक जबाबदार असतील.

सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको,
नवी मुंबई.

प्रत,
दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक मर्या. शाखा, वाशी. नवी मुंबई.
दि. रायगड जिल्हा मध्यवर्ती सह. बॅक. मर्या. शाखा कळंबोली/कामोठे/नवीन पनवेल,नवी मुंबई

सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको,
नवी मुंबई.